राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

शिवनेरी, दुसरा मजला, शासकीय विश्रामगृह, गोल्फ क्लब, नाशिक
दूरध्वनी क्रमांक - ०२५३-२२३२७६४.

जा.क्र.रामाआ-२०१२/अपील/सीआर/२५४९,२५५०,२५५१/ ४९९
दिनांक : २१.०१.२०१४

प्रति,

अपिलार्थी

१) श्री. दिलावरखाण पठाण,
२१८, बी, मेघदुत शॉपींग सेंटर,
२ रा मजला, सी.बी.एस.समोर,
नाशिक.

जन माहिती अधिकारी

२) जन माहिती अधिकारी तथा
१. प्रचार्य, के.बी.आबड, होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय,
चांदवड, ता. चांदवडा, जि. नाशिक.
२. प्रचार्य, मोतीवाला होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय,
मोतीवाला नगर, गंगापूर शिवार, नाशिक.
३. प्राचार्य, धन्वंतरी होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय,
धन्वंतरी कॉम्प्लेक्स, कामठवाडे, सिडको, नाशिक ८.

प्रथम अपिलीय अधिकारी

३) प्रथम अपिलीय अधिकारी तथा
१. विश्वस्त, श्री. नेमीनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम, (जैन गुरुकुल)
नेमी नगर, चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक.
२. विश्वस्त / सचिव, मोतिवाला होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय,
मोतीवालानगर, गंगापूर शिवार, नाशिक.
३. विश्वस्त / सचिव, धन्वंतरी होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय,
धन्वंतरी कॉम्प्लेक्स, कामठवाडे, सिडको, नाशिक ८.

1) LO - A. Desai
2) सोनवणे - -"-

विषय : केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेल्या अपील क्रमांक २५४९,२५५०,२५५१/२०१२ वरील निर्णय, दिनांक : १६/०१/२०१४.

उपरोक्त विषयी मा.राज्य माहिती आयुक्त, नाशिक यांनी सुनावणी घेतलेल्या अपीलांवरील निर्णयाची प्रत यासोबत आपणांकडे पाठविण्यात येत आहे.

कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक.

D:\ketan\covering letter\१६.०१.२०१४.doc

इनवर्ड नंबर : 598 दिनांक : 27.01.14
स्वाक्षरी : शेरा :
प्रशासकीय अधिकारी कार्यालय,
एसएनजेबी, नेमिनगर, चांदवड, जि.नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक :- २५४९/२०१२, २५५०/२०१२, २५५१/२०१२,
सुनावणी दिनांक :- १६/०१/२०१४
निर्णय दिनांक :- १६/०१/२०१४

१ श्री. दिलावरखान पठाण : अपिलार्थी उपस्थित
२१८, बी, मेघदुत शॉपींग सेंटर,
२ रा मजला, सी.बी.एस. समोर,
नाशिक.

विरुध्द

अपील क्र. २५४९/२०१२

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी प्रतिनिधी उपस्थित
प्राचार्य,
के. बी. आबड, होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय,
चांदवड ता. चांदवड जि. नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपस्थित
विश्वस्त,
श्री. नेमीनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम, (जैन गुरुकुल)
नेमीनगर, चांदवड ता. चांदवड जि. नाशिक.

अपील क्र. २५५०/२०१२

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी अनुपस्थित
प्राचार्य,
मोतीवाला होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय,
मोतीवालानगर, गंगापूर शिवार,
नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा अनुपस्थित
विश्वस्त/सचिव,
मोतीवाला होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय,
मोतीवालानगर, गंगापूर शिवार,
नाशिक.

अपील क्र. २०५१/२०१२ : प्रतिवादी उपस्थित

१ जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
धन्वंतरी होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय,
धन्वंतरी कॉम्प्लेक्स, कामठवाडे, सिडको,
नाशिक ८.

उपस्थित

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विश्वस्त/सचिव,
धन्वंतरी होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय,
धन्वंतरी कॉम्प्लेक्स, कामठवाडे, सिडको,
नाशिक ८.

निर्णय

अपिलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांच्याकडे दिनांक ०१/१०/२०१२ रोजी २ आणि दिनांक २४/०९/२०१२ रोजी १ असे वर नमूद केलेले तीन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना नाशिक आयोगाच्या कार्यालयातून दिनांक २७/१२/२०१३ रोजी नोटीस काढून दिनांक १६/०१/२०१४ रोजी अपिलाच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. म्हणून सदरच्या तीन द्वितीय अपिलाची सुनावणी दिनांक १६/०१/२०१४ रोजी घेण्यात आली.

आजच्या सुनावणीस अपिलकर्ता हजर आहेत. त्याचप्रमाणे धन्वंतरी होमीओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक यांचे वतीने चेअरमन सौ. सरोजताई धुमणे पाटील हजर आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा के. बी. आबड, होमिओपॅथि वैद्यकीय महाविद्यालय, चांदवड यांचे वतीने श्री. एम. जी. कोठारी आणि विधी अधिकारी श्री. सुनिल व. कानगो हजर आहेत.

वर नमूद केलेल्या तीनही द्वितीय अपिलामध्ये अपिलकर्ता एकच असल्याने तीनही द्वितीय अपिलाची आज एकत्रित सुनावणी घेण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणात अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिलातील कागदपत्रांची पहाणी करण्यात आली तसेच धन्वंतरी होमिओपॅथि वैद्यकीय महाविद्यालय, नाशिकचे चेअरमन आणि होमिओपॅथि वैद्यकीय महाविद्यालय, चांदवड यांचे प्रतिनिधी यांचे

म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलकर्ता यांचेही म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी दिनांक २०/०६/२०१२ रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन नाशिक जिल्हयातील होमिओपॅथि मेडीकल कॉलेज संदर्भात माहिती मागितली होती. अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती खालील तीन होमिओपॅथि महाविद्यालयाशी संबंधीत असल्याने दिनांक २३/०६/२०१२ च्या पत्राने सदर माहितीचा अर्ज खालील तीन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचेकडे हस्तांतर केला आणि त्याची प्रत अपिलकर्त्यास दिली. १) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, के. बी. आबड, होमिओपॅथि वैद्यकीय महाविद्यालय, चांदवड २) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, मोतिवाला होमिओपॅथि वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक ३) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, धन्वंतरी होमिओपॅथि वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक.

याबाबत आजच्या सुनावणीस धन्वंतरी होमिओपॅथि वैद्यकीय महाविद्यालयाचे चेअरमन आणि के. बी. आबड, होमिओपॅथि वैद्यकीय महाविद्यालय, चांदवड यांचे प्रतिनिधींनी त्यांचे दिनांक १५/०१/२०१४ चे लेखी निवेदन सादर केले आणि सदरच्या लेखी निवेदनात असे नमूद केले की, धन्वंतरी होमिओपॅथि वैद्यकीय महाविद्यालय आणि के. बी. आबड, होमिओपॅथि वैद्यकीय महाविद्यालय, चांदवड हे दोन्ही महाविद्यालय कायम स्वरुपी विना अनुदानित तत्वावर कार्यरत आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांचेकडील याचिका क्र. ५१३२/२००८ निर्णय दिनांक २०/०८/२००९ नुसार विना अनुदानित शैक्षणिक संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदी लागू होत नाही. म्हणून सदरचे महाविद्यालय माहिती अधिकारामध्ये येत नाही असेही त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. तथापि, अपिलकर्ता यांनी असेही नमूद केले की, वर नमूद केलेल्या तीनही होमिओपॅथि महाविद्यालयास शासनाने मान्यता दिलेली असल्याने त्यांना महाविद्यालयाची माहिती मिळणे आवश्यक आहे.

तथापि, प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, सदरच्या तीनही महाविद्यालयास शासनाकडून कायम विना अनुदानित तत्वावर मंजूरी दिलेली आहे. तसेच सदरच्या महाविद्यालयास शासनाकडून कोणत्याही प्रकारचे भरीव वित्तीय सहाय्य प्राप्त होत नसल्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाला अनुसरुन सदरचे तीनही महाविद्यालयास माहिती

अधिकाराच्या तरतूदी लागू होत नाही. म्हणून अपिलकर्त्यास सदरची माहिती उपलब्ध होवू शकत नाही. म्हणून अपिलकर्ता यांचे वरील तीनही द्वितीय अपीले खारीज करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील क्र. २५४९/२०१२, २५५०/२०१२, २५५१/२०१२, खारीज करण्यात येत आहे.

स्थळ : नाशिक
दिनांक : १६/०१/२०१४

(पी. डब्ल्यू. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रत,

१. श्री. दिलावरखान पठाण, २१८, बी, मेघदुत शॉपींग सेंटर, २ रा मजला, सी.बी.एस. समोर, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा १) प्राचार्य, के. बी. आबड, होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय, चांदवड ता. चांदवड जि. नाशिक २) प्राचार्य, मोतीवाला होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय, मोतीवालानगर, गंगापूर शिवार, नाशिक ३) प्राचार्य, धन्वंतरी होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय, धन्वंतरी कॉम्प्लेक्स, कामठवाडे, सिडको, नाशिक ८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ प्रथम अपिलीय अधिकारी तथा १) विश्वस्त, श्री. नेमीनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम, (जैन गुरुकुल) नेमीनगर, चांदवड ता. चांदवड जि. नाशिक २) विश्वस्त/सचिव, मोतीवाला होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय, मोतीवालानगर, गंगापूर शिवार, नाशिक ३) विश्वस्त/सचिव, धन्वंतरी होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय, धन्वंतरी कॉम्प्लेक्स, कामठवाडे, सिडको, नाशिक ८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.